
# होमिओपॅथीद्वारे हृदयविकारावर मात



होमिओपॅथी चिकित्सा व उपचार

डॉ. अमरसिंह निकम

कॉंजेस्टिव्ह कार्डिॲक फेल्युअर (सीसीएफ) ही एक अशी गंभीर अवस्था आहे ज्यामध्ये हृदयाची रक्ताभिसरण क्षमता कमकुवत होते. ज्यामुळे शरीराचे महत्त्वाचे अवयव जसे की, मूत्रपिंड, मेंदू, फुफ्फुसे यांना सुरळीत रक्तपुरवठा होत नाही. मूत्रपिंड निकामी झाल्यामुळे शरीरात पाणी साठून राहते. ज्यामुळे दम लागणे, अशक्तपणा, शरीरावर सूज येणे इत्यादी तक्रारी जाणवतात.

**कारणे –**

१. हृदयाला रक्तपुरवठा करणाऱ्या रक्तवाहिन्यांचा आजार (कोरोनरी आर्टरी डिसीज)
२. जन्मतःच रक्तवाहिन्यांचे आजार
३. हृदयांच्या झडपांचे आजार
४. थॉयराइड ग्रंथींचे विकार
५. हृदयाच्या अनियमित हालचाली (अरिद्मिआ) हा एक जुनाट, दीर्घ काळ वाढत जाणारा आजार आहे. पण तरी हा अचानक उद्भवू शकतो.
६. सतत वाढणारा उच्च रक्तदाब
७. मूत्रपिंड निकामी होणे

**लक्षणे –**

१. सतत होणारा खोकला
२. थोड्याशा शारीरिक कष्टांनी दम लागणे
३. शरीरावर कोठेही सूज येणे
४. खोकल्यावाटे रक्त पडणे
५. थकवा जाणवणे
६. लघवी कमी होणे

या आजारावर ठाम उत्तर नाही आहे. फक्त लक्षणानुसार औषधे देता येतात, परंतु होमिओपॅथीमुळे हृदयाची कार्यक्षमता वाढवता येते व पेशंटचे आयुर्मान वाढते. होमिओपॅथी ही फक्त रोग आणि लक्षणे बरी करणारी उपचारपद्धती नाही, तर ती रोग्याला संपूर्णपणे (शारीरिक व मानसिक) बरी करणारी उपचारपद्धती आहे.

**केस**

ही एका वय वर्ष ७० असलेल्या वृद्धाची केस आहे. ज्याचे हृदय कमकुवत होते व त्यामुळे त्याच्या फुफ्फुसांमध्ये पाणी झालेले होते. त्याचे हिमोग्लोबिन ५.६ % होते.

**त्याच्या तक्रारी –**

१. नाकातून पिवळा द्रव येणे आणि नाक बंदिस्त रूममध्ये जास्त वाहत असे.
२. डोळ्यांखाली व पायांवर सूज येणे.
३. १५-२० वर्षांपासून जिना चढताना दम लागणे
४. तीव्र बद्धकोष्ठता, गुदद्वारातून रक्त येणे
५. गूळ, शिजलेला भात खाण्यास मनाई केली
६. प्रोस्टेटचे ऑपरेशन झालेले होते
७. सतत दम लागणे
८. रात्रीच्या वेळी २ ते ३ नंतर खोकला व धाप वाढणे

**विशेष माहिती –**

१. तहान कमी लागणे
२. जेवणामध्ये तेलकट, फळे, दूध यांची आवड
३. भाताने बद्धकोष्ठता होणे
४. रात्री ३ ते ४ वेळा लघवीला होणे, पण लघवी कमी प्रमाणात होते
५. चेहऱ्यावर घाम जास्त, जेवताना कमी
६. झोपाळूपणा, झोपेत बडबडणे
७. मोकळ्या हवेत भवासाचा त्रास कमी
८. प्रकृती - उष्ण

निरीक्षण - त्या आजोबांनी डोक्यावर गांधी टोपी व नेहरू कोट परिधान केला होता. मोठे नाक, मोठे कान, मोठे कपाळ. वृद्धापकाळ, पण तरीसुद्धा प्रभावशाली वाटत होते. ते कडक स्वभावाचे व कमी बोलणारे होते. त्यांना बोलताना खूप दम लागत होता, त्यामुळे त्यांची पूर्ण माहिती पत्नी व मुलीने दिली.

**स्वभाव –**

**१. तुमचा स्वभाव कसा आहे?**

त्यांचा स्वभाव मेहनती व धैर्यवान आहे. कोणी वाईट वागलेले त्यांना चालत नाही. तीन भावांमध्ये हे छोटे आहेत. मधल्या भावाचा मृत्यू झाला आहे. आई लहानपणीच वारली. वडिलांचा मृत्यू १९८१ मध्ये झाला. हे गावी राहत होते. तिथे दहावीपर्यंत त्यांचे शिक्षण झाले. सगळे भाऊ वेगळे राहतात. लग्नानंतर हेसुद्धा वेगळे झाले आणि पुण्यात आले.

**२. तुमचे लग्न कधी झाले?**

१९४० साली झाले. लग्नानंतर मी मुलांच्या शिक्षणासाठी पुण्यात आलो. सायकलवरून व्यवसाय चालू केला. हळूहळू व्यवसाय वाढला. व्यवसायासाठी कर्ज घेतले होते. ते मी वेळोवेळी देत होतो. मला कुणी दारात पैशासाठी आलेलं आवडत नाही. सगळ्या मुलांना उच्चशिक्षित केले. एक इंजिनिअर, एक डॉक्टर, एक कॉन्ट्रॅक्टर आहे.

**३. व्यवसाय का बंद केला?**

धंदा कमी होत चालला होता. त्यामुळे डॉक्टर मुलीला दुकान दिले. माझ्या भावांनी मला शिकू दिले नाही, पण मी माझ्या मुलांना उच्च शिक्षण दिले.

४. तुम्हाला तणाव केव्हा जाणवतो?

पत्नीने सांगितले की, एका सुनेशी पटत नाही म्हणून त्यांना वेगळे राहण्यास सांगितले, पण याविषयी कोणी टिप्पणी केलेली त्यांना आवडत नाही. त्यांचं म्हणणं आहे की, मी माझ्या जबाबदाऱ्या पूर्ण केल्या. त्यांना कोणावर अवलंबून राहायला आवडत नाही. स्वावलंबी स्वभाव आहे. गरिबांसाठी हॉस्पिटल काढण्याची इच्छा आहे. गरिबांना मदत करण्याची इच्छा आहे. आधी खूप वेळा रक्तदान केले आहे. त्यांना प्रसिद्धी आवडत नाही.

संपूर्ण व्यक्तिमत्त्व -

१. कौटुंबिक
२. कनवाळू
३. समाजसेवेची इच्छा
४. स्वाभिमान
५. उपेक्षित
६. गंभीर
७. वैचारिक
८. कडक स्वभाव
९. डोळ्यांवर व पायावर सूज
१०. तहान कमी
११. जेवणानंतर चेहऱ्यावर घाम
१२. रात्री लक्षणांमध्ये वृद्धी
१३. मोकळ्या हवेत बरे वाटणे
१४. उष्ण प्रकृती

या सगळ्या लक्षणांवरून त्यांना होमिओपॅथिक औषध सुरू केले. आठवड्यात त्यांची सर्व सूज गेली. रक्तदाब सुरळीत झाला. दम लागणे, अशक्तपणा कमी झाला. भूक वाढली. चेहऱ्यावर प्रसन्नता दिसत होती. रक्त न भरता हिमोग्लोबिन वाढू लागले. किडनीचे कार्य सुरळीत चालू झाले. हृदय नियमितपणे काम करू लागले. मूळव्याधीचा त्रास कमी झाला. होमिओपॅथीच्या एकाच औषधाने सर्व गंभीर लक्षणांवर मात करीत रुग्णाला निरोगी आणि आनंदी बनविले.

**■ पत्ता – आदित्य होमिओपॅथिक हॉस्पिटल ॲण्ड फिलिंग सेंटर, तपोवन रोड, पिंपरी गाव, पुणे–१७. संपर्क – ०२०–६९३३७०८०, २७४१२५४९, २७४१२१९७**

# स्वाइन फ्लूने दोघांचा मृत्यू, बळींची संख्या ८४

**। पुणे : प्रतिनिधी**




शहरात स्वाइन फ्लूचे थैमान सुरूच असून, या आजारामुळे आणखी दोन रुग्णांचा बळी गेला आहे. शहरात स्वाइन फ्लूने मृत्युमुखी पडलेल्यांची संख्या आता ८४ झाली आहे. सध्या ६ रुग्ण अत्यवस्थ असून, त्यांना व्हेंटिलेटरवर ठेवण्यात आले आहे.

शहरातील सध्याचे वातावरण स्वाइन फ्लू वेगाने पसरण्यास कारणीभूत ठरले आहे. सध्या महानगरपालिकेच्या व खासगी रुग्णालयांत स्वाइन फ्लूच्या रुग्णांची तपासणी करण्यात येत आहे. १ जानेवारीपासून आजअखेर १ लाख ५७ हजार २२९ संशयित स्वाइन फ्लूच्या रुग्णांची तपासणी करण्यात आली आहे. त्यातील १८ हजार १९ रुग्णांना टॅमी फ्लूची औषधे देण्यात आली आहेत. सोमवारी १ हजार ७६३ रुग्णांची तपासणी करण्यात आली. त्यातील ७८ रुग्णांना टॅमी फ्लूच्या गोळ्या देण्यात आल्या. आजारामुळे जानेवारीपासून शहरात ८४ रुग्णांचा मृत्यू झाला. सध्या ८ रुग्णांवर जनरल वॉर्डमध्ये उपचार सुरू आहेत. गेल्या वर्षात ११ रुग्णांचा त्यामुळे मृत्यू झाला होता. शहरातील २ लाख ४६ हजार ३०१ नागरिकांची स्वाइन फ्लूची तपासणी करण्यात आली. आजपर्यंत शहरात स्वाइन फ्लू झालेल्या रुग्णांची संख्या ८०३ इतकी झाली आहे.

सर्दी, खोकला, अंगदुखी, पोटदुखी, मळमळ, थंडी वाजणे, अधिक ताप, उलटी, जुलाब व पोटदुखी आदी लक्षणे दिसत असतील, तर त्यावर तातडीने उपचार घ्यावेत. तसेच प्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी पौष्टिक आहार घ्यावा आणि डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार मल्टिव्हिटॅमिनच्या गोळ्या घ्याव्यात. सार्वजनिक, गर्दीच्या ठिकाणी जाणे टाळावे. बाहेर पडताना मास्कचा वापर करावा, तसेच घाबरून जाऊ नये, असे आवाहन आरोग्य विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

दरम्यान, स्वाइन फ्लूला रोखण्यासाठी कडक ऊन महत्त्वाचे असते. सध्या शहरात कडाक्याचे ऊन पडू लागले असल्यामुळे स्वाइन फ्लूच्या रुग्णांच्या संख्येत घट होऊ लागली आहे.

# तिरळेपणा शस्त्रक्रियेद्वारे रुग्णांना दिलासा



**। बारामती : प्रतिनिधी**

ॲग्रिकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्ट बारामती आयोजित व पुणे नेत्रसेवा प्रतिष्ठान, बारामती नेत्रतज्ज्ञ संघटना, भूलतज्ज्ञ संघटना यांच्या सहकार्याने सिल्व्हर ज्युबिली हॉस्पिटल बारामती येथे दि. १७ ते २९ एप्रिल २०१५ या तीन दिवसांत तिरळेपणा निर्मुलन शिबिराचा यशस्वी समारोप झाला. यासाठी २२५ रुग्णांनी नावनोंदणी केली. १४० रुग्णांची तपासणी दि. १७ एप्रिल २०१५ रोजी करण्यात आली. त्यापैकी ५० रुग्णांवर शस्त्रक्रिया करण्यात आल्या व त्यांचा तिरळेपणातील दोष निर्मुलन करण्यात आला. इतर ९० रुग्णांवर उपचार करण्यात आला. चष्मा वाटप करून किंवा इतर उपचार करून त्यांचा दृष्टीदोष बरा होण्याचा सल्ला देण्यात आला.

या उपक्रमांना पुण्याचे सुप्रसिद्ध नेत्रतज्ज्ञ डॉ. मधुसुदन झंवर व त्यांचे २० तंत्रतज्ज्ञ डॉक्टरांचे सहकार्य लाभले. बारामती येथील नेत्रतज्ज्ञ डॉ. महेश काटे, डॉ. जयपाल चोपडे, डॉ. राऊत, डॉ. सचिन कोकणे, बारामतीतील भुलतज्ज्ञ संघटनेच्या डॉक्टरांनी मोलाचे सहकार्य केले.

शिबिरास संस्थेचे चेअरमन राजेंद्र पवार, विश्वस्त सुनंदा पवार, डॉ. अविनाश बारवकर, नगराध्यक्ष सुभाष सोमाणी, सभापती करण खलाट, मुख्याधिकारी दीपक झिंजाड, पंचायत समितीचे गटविकास अधिकारी राहुल काळभोर यांनी भेट देवून रुग्णांना शुभेच्छा दिल्या तसेच सर्व डॉक्टरांचे कौतुक केले.




# उन्हाळ्यात आरोग्याची काळजी घ्यावी : डॉ. रासगे

**। दौंड : प्रतिनिधी**

**उष्माघात व तत्सम आजारांपासून वाचविण्यासाठी सरकारी रुग्णालयांमध्ये ओ.आर.एस. पावडर उपलब्ध असते. ती पावडर पाण्यामध्ये मिसळून दिवसभर ते पाणी पिल्यास उष्माघातासारखा प्रकार होणार नाही. तसेच लिंबू पाणी, ताकचा वापर अवश्य करावा, अशी माहिती तालुका आरोग्य अधिकारी डॉ. रासगे यांनी दिली.**

उन्हाळा ऋतू सुरू झाला आहे. प्रखर उन्हामुळे अनेक व्याधी व आजार होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे नागरिकांनी विशेष काळजी घ्यावी. खाली दिलेले उपाय केल्यास प्रखर उन्हाने निश्चित सुटका होईल, अशी माहिती दौंडचे आरोग्य अधिकारी डॉ. रासगे यांनी यवत येथे पुण्यनगरीशी बोलताना दिली.

उन्हाळा म्हटलं की, सूर्याच्या प्रखर किरणांचे शरिरावर चांगलेच दुष्परिणाम जाणवतात. कडक उन्हामुळे शरिराच्या व त्वचेच्या अनेक समस्यांचा सामना करावा लागतो. या कडक उन्हाचा शरिरावर होणारा दुष्परिणाम म्हणजे उन्हामुळे पाण्याचं प्रमाण कमी होणं. पाण्याचं प्रमाण संतुलित ठेवण्याकरता दररोज जास्तीत जास्त स्वच्छ असलेल पाणी प्यायला हवं. उन्हाळ्यात जंकफूड खाणं टाळावं. चहा व कॉफी पिणं टाळावं. ताक, लिंबू पाणी, नारळाचं पाणी उत्तम. सैल, सुती कपडांचा वापर करावा. दिवसातून दोनवेळा चेहरा थंड पाण्याने स्वच्छ धुवावा. थंड अथवा हलक्या गरम पाण्याने दिवसातून दोन वेळा अंघोळ करावी.

डोळ्यांचं संरक्षण करण्याकरता गॉगल तसंच स्कार्फ, टोपी यांचा वापर करावा. नियमित पोषक व सकस आहार घ्यावा. सी व डी जीवनसत्त्व असलेली फळं खावीत. उदा. कलिंगड, टरबूज, जाम, काकडी इ. तसेच पालेभाज्यांचं सूप उत्तम. उन्हाने त्वचा विकारासाठी टोमॅटो कुस्करून त्यात थोडं ताक घालून ते त्वचेवर चोळल्याने त्वचेला थंडावा मिळतो. काकडीचा रस, ग्लिसरीन आणि एक चमचा गुलाबपाणी घेऊन त्वचेवर लावल्याने त्वचा नरम पडते. लोणी आणि पाणी मिसळून चांगलं फेटावं आणि ते रापलेल्या त्वचेवर लावावं त्याने त्वचेची जळजळ कमी होते. अशी उपयुक्त माहिती डॉ. रासगे यांनी दिली.

# यकृताच्या शस्त्रक्रियेसाठी आर्थिक मदतीचे आवाहन

पुणे : प्रतिनिधी

ध्रुविका समीर गायकवाड (वय ९) हीचे लिव्हर काढून त्याऐवजी तिची आई शरयू यांच्या लिव्हरचा काही भाग बसवायचा आहे. दोघींवर केईएम हॉस्पिटल पुणे येथे एप्रिल २०१५ च्या शेवटच्या आठवड्यात शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे. त्याचा खर्च बारा लाख रुपये येणार असल्याचे अंदाजपत्रक रुग्णालयाने दिले आहे. मुलीचे पालक अपंग मुलांचे शाळेत शिक्षक आहेत. त्यांची आर्थिक परिस्थिती चांगली नाही. त्यामुळे या शस्त्रक्रियेसाठी आर्थिक मदत करावी, अशी पालकांची विनंती आहे. रुग्णालयाचा एडीएफसी बँक बोट क्लब शाखा पुणे - १ खाते क्र. ५०१०००१२५१ असून, आयएफसी कोड न. एचडीएफसी ००००३९ असा आहे. रुग्णाचा हॉस्पिटलचा नं. पीटी १८७४०१ असा आहे. आर्थिक मदत या क्रमांकावर हॉस्पिटलच्या नावाने जमा करावी, असे आवाहन पालकांतर्फे करण्यात आली आहे.

## आपलं व्यासपीठ

### प्लास्टिकचे प्रदूषण थांबविणे गरजेचे



प्लास्टिक बंद करा, त्यापासून होणारे पर्यावरण प्रदूषण थांबवा म्हणून सुजाण लोक जीव तोडून सांगत आहेत. परंतु, त्याचा आपल्या लोकांवर, सरकारवर काहीही परिणाम दिसत नाही. आपले नागरिक घरातील सर्व घाण, कचरा प्लास्टिकमध्ये भरूण रस्त्यावर, गावांत, शेतात, अंगणात, झाडावर, कॅनॉल तर प्लास्टिकनेच भरला आहे. त्यामुळे कित्येक जनावरे मेली आहेत. नदी पात्रात प्लॅस्टिक पिशव्यांमध्ये मोठ्या प्रमाणात कचरा, अन्नपदार्थ, इतर वस्तु टाकल्या जातात. यामुळे नदीप्रदुषन वेगाने होते. महापालिकांमध्ये प्लॅस्टिक पिशव्याला बंदी घातली असली तरी याची अंमलबजावणी होत नसल्याचे दिसून येते आहे.

२० मायक्रॉनपेक्षा कमी जाडी असलेल्या प्लास्टिकवर बंदी का आणत नाहीत. त्यावर कठोर शिक्षा का नको. म्हणे समुद्रामध्ये लाखो टन प्लास्टिक आहे, असे असेल तर पृथ्वीचा चंद्र होण्यास किती वेळ लागणार आहे. म्हणून सर्वांनी मिळून प्लास्टिक प्रदूषण थांबविणे गरजेचे आहे.

**बबनराव टेकवडे, मांजरी,**

**कॉंग्रेस उपाध्यक्ष राहुल गांधी यांनी रविवारी मोदी सरकारवर चांगलाच हल्लाबोल केला. ५६ दिवसांच्या सुटीनंतर परतलेल्या राहुल यांनी दिल्लीत आयोजित शेतकरी मेळाव्यात बोलताना नव्या भूसंपादन विधेयकावरून केंद्र सरकारला घेरले. मोदी–भाजपने आपले मार्केटिंग आणि ब्रँडिंग करण्यासाठी उद्योजकांकडून हजारो कोटी रुपये कर्ज घेतले. आता यातून उतराई होण्यासाठी शेतकऱ्यांची जमीन त्यांच्या खिशात घालू पाहत असल्याची टीका राहुल यांनी केली. सरकार शेतकरी आणि कामगारांचे असल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटले आहे. कालच्या प्रकारानंतर आता भूसंपादन कायदा पुन्हा चर्चेत आला आहे. काल झालेल्या या टीकासत्राबाबत तरुणांची मते...**

यूथ Talkers

## राहुल गांधींची भूमिका औत्सुक्याची



अनेक जाचक अटी असलेला हा कायदा शेतकऱ्यांसाठी योग्य नाही. या कायद्यामुळे आपल्याच जमिनीबाबत शेतकऱ्याला न्याय मागता येणार नाही. त्यामुळे शेतकऱ्यांच्या मोक्याच्या जमिनी उद्योगपतींच्या घशात जाण्याची शक्यता आहे. काल झालेल्या सभेतून त्यांची आक्रमकता दिसून आली.

**–गणेश यादव**



सुधारित भूसंपादन कायदा या देशाच्या विकासासाठी अत्यंत पूरक आहे. मात्र त्यामुळे शेतकऱ्यांवर अन्याय होता कामा नये. राहुल यांचा या विषयात अभ्यास नसल्याचे जाणवते. त्यामुळे त्यांनी याविषयी अभ्यास करावा आणि रस घेऊन काम करावे. विरोधात आहे म्हणून मोदींवर कायमच टीका करणे योग्य नाही.

**– प्रसाद शेंडे**



भूसंपादन कायदा आवश्यकच आहे. कारण देशात अनेक चांगले प्रकल्प आहेत जे फक्त भूसंपादनामुळे रखडले आहेत. फक्त हा कायदा शेतकऱ्यांच्या मुळावर उठणारा नको. त्यात उद्योगपतींबरोबर सामान्यांचाही विचार हवा. भाजपची धोरणे योग्य आहेत. मात्र त्याची अंमलबजावणी करताना व्यापक विचार होणे गरजेचे आहे.

**– राजेंद्र पोमण**

**या सदरांतर्गत तुम्हीही आपली मते व अनुभव मांडू शकता. तुमची मते बहिरट पाटील आर्केड, दुसरा मजला, बालगंधर्व चौक, शिवाजीनगर, पुणे-५ या पत्त्यावर किंवा ambika.pune@gmail.com या मेल आयडीवर पासपोर्ट साइज फोटोसह पाठवावीत.**